मुख्य प्रवेशव्दार

022
29/1/2013

सर्वसधारण जिल्हा वार्षिक योजना 2012-13
प्रशासकिय मान्यता व निधी वितरण आदेश

**जिल्हा नियोजन समिती**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर**
क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-5/ 120 /2012-13
दिनांक 16 / 01 / 2013

वाचा 1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444 दि.16/02/2008
2) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अंदाज2012/प्र.क्र.64/2012/अर्थसंकल्प-3 दि.6/07/2012
3) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांचे वनाशाकवसविसं/ संचालक/ निरंक /12 दिनांक 17/7/2012
4) महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्र. अर्थसं-2012/(519/12)/लेखा 2 दिनांक 31/12/2012

---

उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 नुसार सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाकडील योजना/कामे वगळुन या निधीतील कामांना प्रशासकिय मान्यता देण्याचे व निधी वितरणांचे अधिकार जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यांना प्रदान केले आहेत.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2012-13 करीता नागपूर जिल्हयातील योजनेकरीता शासनाने रू. 16000.00 लाख नियतव्यय मंजूर केलेला आहे त्यापोटी रू 16000.00 लाख नियतव्यय मार्च-एप्रिल 2012 च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पीत अनुदानापैकी रू.12523.14 लाख अनुदान नागपूर जिल्हयाकरीता बी.डी.एस. संगणक कार्यप्रणालीद्वारे प्राप्त आहे

उपरोक्त संदर्भ पत्र क्र. 3 अन्वये संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांचेकडुन उच्च शिक्षण या उपलेखाशिर्षाखालील शासकिय महाविद्यालयांचा विकास या योजनेअंतर्गत 1.संस्थेतील मुख्य प्रवेशव्दार, तिन रुम्सचे अद्यावतीकरण प्रसाधनगृहे व अन्य कार्याला व 2. संस्थेतील 3 रुम्सच्या अंतर्गत अद्यावतीकरण करतांना येणारा विद्युत खर्च याबाबतचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसह प्रशासकिय मान्यतेसाठी सादर केले आहे. सदर कामास संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त संदर्भ शासन निर्णय क्र. 1 च्या अधिन राहुन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2012-13 अंतर्गत मंजुर तरतुदीपैकी अपुर्ण कामावर वजा जाता शिल्लक असलेल्या निधीच्या दिडपटीत प्रशासकिय मान्यता प्रदान करता येते. अपुर्ण कामासाठी निधीची मागणी नसल्यामुळे उच्च शिक्षण या उपलेखाशिर्षाखालील शासकिय महाविद्यालयांचा विकास या योजनेअंतर्गत 1. संस्थेतील मुख्य प्रवेशव्दार, तिन रुम्सचे अद्यावतीकरण प्रसाधनगृहे व अन्य कार्याला 45,00,000/- व 2. संस्थेतील 3 रुम्सच्या अंतर्गत अद्यावतीकरण करतांना येणारा विद्युत खर्च 16,54,817/- असे एकूण 61,54,817/- अंदाजपत्रकीय किंमतीस खालील अटी व शर्तीचे आधीन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत असुन आता बी.डी.एस. संगणक प्रणालीवर उपलब्ध झालेला निधी रू. 40.00 लक्ष (अक्षरी रूपये चाळीस लाख फक्त) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांना वितरीत करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

1. योजनेबाबत शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शकसुचना, निकष तपासणी सुची, अटी व शर्तीनुसार योजनांवर/कामांवर खर्च करणे बंधनकारक राहील
2. सन 2012-13 मधील या योजनेच्या कामावर मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालु वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावा.
3. खर्चाची बाब शासन मान्य असल्याची खात्री केल्यावरच योजनांवर खर्च करावा.
4. जिल्हा योजनांकरीता वितरीत केलेले अनुदान ज्या योजनेकरीता/प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आले आहे. त्याच योजनेवर/ प्रयोजनांसाठी खर्च करणे बंधनकारक राहील.
5. सदर काम अथवा कामाचा भाग या कार्यक्रमाव्यतीरीक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत अथवा योजनेतर कामात अंतर्भुत नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी.
6. सदर योजनेसाठी आपल्या प्रशासकीय विभागाने दिलेल्या सुचनानुसार/लेखापध्दतीप्रमाणे या कार्यक्रमाचा हिशेब योजनानिहाय स्वतंत्र ठेवावा.
7. तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मान्यता सक्षम अधिकारी यांनी दिली आहे या अटीवरच निधीचे वितरण करण्यांत येत आहे. तांत्रिक मान्यता देतांना काही अटी व शर्ती असल्यास त्याची पुर्तता करणे बंधनकारक राहील तसा अहवाल या कार्यालयास पाठवावा
8. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याबरोबर काम पुर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादी बाबतची माहिती आपल्या मंत्रालयीन प्रशासकिय विभागास व कार्यालयास सादर करावी. यासंबंधिची जबाबदारी संबंधित प्रशासकिय विभागाची राहील.
9. जिल्हा वार्षिक योजनेतुन घेण्यात येणारी कामे दोन वर्षाच्या कालावधीत पुर्ण होणे आवश्यक राहील.
10. अपुर्ण कामे पुणे करण्यास आवश्यक निधीची पुर्ण तरतुद केल्यानंतरच नविन कामे घेण्यात यावी
11. योजना पुर्ण झाल्यावर त्यावर पुनः तरतुद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यांत यावी
12. योजनेत्तर स्वरुपाच्या कामांसाठी (देखभाल दुरुस्ती इ) सदरची तरतुद उपयोगात आणली जाणर नाही याची दक्षता घ्यावी.
13. प्रस्तुत इमारतीचे काम वास्तुशास्त्रज्ञाकडुन मांडणी नकाशा तयार करुन घेतल्यावरच सुरु करावीत.
14. विद्युतीकरणाची कामे करतांना संबंधित विभागाची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक राहील
15. प्रस्तावित कामाच्या प्रकरणामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील
16. योजना राबविण्याची सनियंत्रण व देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेची किंवा शासकीय अभिकरणाची राहील
17. या योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांची नोंद मालमत्ता नोंदवहीत करून त्या कामाचे परीरक्षण करण्याची खबरदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावी.
18. शासनाचे प्रचलित नियम विहित कार्य पध्दतीनुसार निविदा व खरेदी प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक राहील, कामाची निविदा प्रक्रिया विहीत मापदंडास अनुसरून इ-टेंडरींग (E-Tendering) द्वारे करण्यात यावी.
19. जिल्हा वार्षिक योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहील.
20. जिल्हा योजनेसंबंधी विधी मंडळास माहिती सादर करणे तसेच विधीमंडळाच्या मागदर्शक सुचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पिय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकिय विभागाची राहील.

21. सदर योजनेत समाविष्ट असलेले काम/कामे अन्य कोणत्याही योजनेतुन घेण्यात आलेली नाहीत, याबाबतची खात्री करावी व कामाची द्विरूक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
22. कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या मासिक खर्चाचे अहवाल दरमहा 5 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.
23. या कार्यक्रमावर होणारा खर्च स्वतंत्रपणे नोंदविण्यासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पासून लेखाशिर्षामध्ये काही बदल करण्यांत आले आहेत. हे बदल लक्षात घेऊन खर्च नोंदवितांना सुधारीत लेखाशिर्ष नोंदविण्याची दक्षता सर्व संबंधीतांनी घ्यावी.
24. या कार्यक्रमावर होणारा खर्च रोख प्रवाहानुसार करण्यांत यावा.
25. या कार्यक्रमावर होणारा खर्च

    मागणी क्र. ओ. 38

    मुख्य लेखाशिर्ष - 2202 सर्वसाधारण शिक्षण

    03 विद्यापिठीय व उच्च शिक्षण

    103 शासकिय महाविद्यालये व संस्था

    (55) जिल्हा योजना नागपूर

    (55) (06) शासकिय कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षण शास्त्र अध्यापक महाविद्यालयाची गुणवत्ता वाढ सुधार कार्यक्रम (2202 बी 536)

    27 लहान बांधकामे

    या उपशिर्षाखाली वर्ष 2012-13 मध्ये केलेल्या तरतुदीमधुन भागवावा.

स्वा/-

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत)

प्रति, संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व सामजविज्ञान संस्था, नागपूर

**प्रत - माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह सादर/अग्रेषित**

1. मा. प्रधान सचिव व विकास आयुक्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
2. मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32.
3. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महा. राज्य पुणे-1
4. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
5. महालेखापाल महाराष्ट्र-2 नागपूर (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)
6. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 नागपूर
7. वरिष्ठ जिल्हा कोषगार अधिकारी, नागपूर
8. लेखा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती नागपूर

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर करीता